# नगर परिषद वाशिम, जि. वाशिम
## MUNICIPAL COUNCIL WASHIM, DIST. WASHIM

ईमेल – coud.washim@maharashtra.gov.in
comcwashim@gmail.com

दुरध्वनी क्र. – 07252 232131
वेबसाईट – www.mahaulb.in


कामाचे नांव :- शहरातील विविध भागात नगर परिषद अंतर्गत टाकण्यात आलेल्या पाईपलाईन वरील लिकिजेस दुरुस्ती करणेकरिता व इतर कामाकरिता साहित्य पुरवठा करणेबावत. (2027-28)

संदर्भ :- निविदा सुचना/जा. क्रं/नपवा/कार्या-19/ई.नि.सू/ दिनांक / /2026

कोरे निविदा प्रपत्र किंमत :- रूपये 590/- ( पाचशे नव्वद रूपये फक्त )

सदर कामासाठी मुख्याधिकारी, नगर परिषद, वाशिम हे दोन लिफाफे ( Two bid system ) पध्दतीने ई-निविदा मागवित आहे.

**लिफाफा क्र. 1 तांत्रिक बोली (Technical bid) मधील आवश्यक कागदपत्रे**

निविदा अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे लिफाफा क्र. 1 साठी अपलोड करावीत.

- **बयाणा रक्कम :- निविदे सोबत 1 टक्के प्रमाणे इसारा रक्कम 1,00,000/- ( अक्षरी एक लक्ष रुपये फक्त ) ऑनलाईन भरुन पोच पावती सादर करावी.**
- आधार कार्ड असणे बंधनकारक आहे.
- PAN कार्ड असणे बंधनकारक आहे.
- MGP/आस्थापणा यांचे नोंदणी असणे आवश्यक आहे.
- GST नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.
- सदर कामाचे संबंधित नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसबंध किंवा भागीदारी नसल्यास रू 100 / - स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.
- मागिल सलग तीन वर्षाचे आयकर भरलेले CA ने प्रमाणित केलेले वार्षिक रू. 50.00 लक्ष.इतके उलाढाल प्रमाणपत्र ( Turnover Certificate) असणे बंधनकारक आहे
- मागिल सलग तिन वर्ष आयकर (IT) भरल्याचे पत्र सादर करणे बंधनकारक आहे.
- बॅक सालव्हन्सी रू. 50.00 लक्ष रूपयेची निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.
- **शासकिय/नगरपरिषद नगरपंचायत स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेले अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (अनुभवासाठी निविदाकाराने प्रत्यक्ष काम केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कार्यदिश चालणार नाही)खोटे अनुभव प्रमाणपत्र सादर केल्यास दरपत्रक धारकास अपात्र करून दर उघडण्यात येणार नाहीत. व पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.**
- खोटे कागदपत्रे सादर न केल्याबाबत निविदाकाराने रू 100/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.
- आस्थापणा /संस्था नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करावे.

Scanned with OKEN Scanner

लिफाफा क्रं. 2 (आर्थिक बोलीचा ) ( Financial bid)

यामध्ये फक्त निविदा दर टाकावा, निविदा दर अंकी व अक्षरी अशा पध्दतीने लिहावे नमुद दरामध्ये सर्व शासकिय व इतर करांचा समावेश आसावा.

<u>निविदा सादर करणे</u>

1. या सर्व पुरवठादाराने Digital Signature ची नोंदणी/ नुतनीकरण करणे आवश्यक आहे.
2. सर्व दस्तऐवज SCAN करुन ऑनलाईन ई- निविदा प्रणालीचा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या वेळापत्रका नुसार upload करणे अनिवार्य राहील. Technical bid मधील कागदपत्रे Hardcopy मध्ये सादर करणे आवश्यक आहे.
3. ईसारा/ बयाणा रक्कम ई- निविदा संचाची किंमत ऑनलाईन भरुन पोच पावती सादर करावे. लिफाफा क्रं. 1 मधील आवश्यक कागदपत्राची पुर्तता होत नसल्यास निविदा स्विकारणे अथवा नामंजुर करण्यात येउन लिफाफा क्रं. 2 उघडण्यात येणार नाही. तसेच याबाबत मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतीम व निविदाधारकास बंधनकारक राहील.
4. निविदेसोबत बयाणा रक्कम न भरल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रा मध्ये खरेपना न आढल्यास, निविदा सादर करताना भ्रष्ट व कपट मार्गाचा अवलंब केल्याचे निर्देशनास आल्यास, सशर्त निविदाची नगर परिषदेने नमुद केलेली पात्रता पुर्ण करू न शकल्यास/ अशा परिस्थितीत निविदा फेटाळण्यात/नामंजुर करण्यात येतील.सर्व साधारण व शक्यतो वाजवी व कमीत कमी दराची निविदा स्विकारणेत येईल.
5. **उपरोक्त निविदेमध्ये मागणी केलेली सर्व कागदपत्रे अनुक्रमेनुसार सादर करावे. व या व्यतीरिक्त कोणतेही अनावश्यक कागदपत्रे निविदेमध्ये सादर करू नये. निविदेमध्ये मागणी केलेल्या कागदपत्रा शिवाय अनाअवश्यक कागदपत्र सादर केलेल्याचे आढळुन आल्यास कागदपत्राची पडताळणी न करता सादर केलेली निविदा अपात्र ठरवुन नामंजुर करण्यात येईल.**

<u>निविदेच्या अटी व शर्ती</u>

1.मुख्याधिकारी,नगर परिषद वाशिम हे निविदेतील प्रपत्रामध्ये दर्शविलेल्या तपशिलवार वर्णनाच्या कामाकरिता दोन लिफाफे पध्दीतीने ई – निविदा मागवित आहेत.

2 .निविदा WWW.mahatendres.gov.in; या वेबसाईटवर सविस्तर पाहावयास मिळतील व तेथेच निविदा सादर करणे आवश्यक आहे.

3.कोरी ई- निविदा शुल्क रू. 590/- ( पाचशे नव्व्द रूपये फक्त) ऑनलाईन भरून पोच पावती सादर करावे. **तसेच निविदा शुल्क नापरतावा असेल.**

4. लिफाफा क्रं. 1 (तांत्रिक निविदेचा लिफाफा) यामध्ये खालील कागदपत्राचा (PDF) समावेश राहील. संस्थेच्या नोंदणीला (Shop Act) परवाना/ विक्रिकर नोंदणी 31/03/2025 पर्यंतचे PAN कार्डची सत्यप्रत इ. कागदपत्राची सत्यप्रत सांक्षाकित केलेल्या सादर कराव्यात.

5. लिफाफा क्रं.1 मधील कागदपत्राची तपासणी करून योग्य आढळल्यास लिफाफा क्रं.2 उघडण्यासंबंधी निर्णय घेतला जाईल. सर्शत निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

6. ज्या निविदेमध्ये दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरामध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल.अक्षरी व अंकी दरामध्ये तफावत असल्यास दोन्हीपैकी कमी दर असेल तो दर विचारात घेतला जाईल.

Scanned with OKEN Scanner

7. ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत केली जाईल. त्या निविदाधारकाने 2 % सुरक्षा ठेव (एस.डी) म्हणुन मुख्याधिकारी नगर परिषद, वाशिम हयांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकचे धनकर्ष किंवा रोख स्वूरूपात भरणा करावे लागेल. ज्या निविदाधारकांने काम मंजुरी समज दिनांकापासून दिलेल्या मुदतीच्या आत सुरक्षा रक्कमेचा भरणा केला नाही. अशा निविदाधारकांची निविदा रदद करून त्याची निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करणेत येईल. तसेच देयकामधुन सुरक्षा ठेव व इतर प्रचलित नियामाप्रमाणे कपाती करण्यात येईल.

8. निविदा मंजुर झाल्यानंतर निविदाधारकास रितसर करारनामा (आवश्यक किंमतीचे मुद्रांक स्टॅम्प पेपरवर ) लिहुन दयावा लागेल निविदेतील सर्व अटी व शर्तीचा करारनाम्यामध्ये समावेश राहील.

09. खोटे कामगार दाखवुन देयक सादर केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार यांची राहील. तसे निदर्शनास आल्यास दंडासह रक्कम वसुली करण्यात येईल.

10. कामावर असलेल्या कामकगारांना युनीफार्म व सर्व सुरक्षा उपकरणे जसे की, रेनकोट,सेप्टी शुज, हॉन्डग्लोज,बॅटरी व इतर पुरवठा करणे ची जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.

11. नियमानुसार व निधीच्या उपलब्धेते नुसार देयक तपासणी करून अदायगीची कार्यवाही करण्यात येउन नियामाप्रमाणे रेखांकित धनादेशाव्दारे अदायगी करण्यात येईल.

12 निविदा धारकांने नमुद केलेले दर हे सर्व कर ,जकात,वाहतुक ,खर्च, तपासणीखर्च,विमा रक्कत .इ असावेत.

13 विहीत मुदतीत काम करणेस कंत्राटदारकडुन कसुर झाल्यास पुढील प्रत्येक दिवसासाठी कामाच्या अंदाजित खर्चाच्या एक टक्के किंवा मुख्याधिकारी ठरवुन देईल अशी रक्कम भरपाई म्हणुन देण्यास कंत्राटदार पात्र असेल अशी रक्कम अंदाजित खर्चाच्या 10 % पेक्षा जास्त असणार नाही. ज्या बाबीचा उल्लेख अटी व शर्ती अथवा करारनामा या मध्ये समाविष्ट झाल्या नसेल त्या बाबी महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2013 नुसार लागु राहतील.

**14 निविदाधारकांने निविदा दाखल केल्यापासुन त्याची वैधता 30 दिवस पर्यंत राहील.**

15 निविदेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास वाशिम नगरपरिषद ज्या न्यायलयाच्या कार्यक्षेत्रात येते त्या कार्यक्षेत्रात चालववावयाचा आहे.

16. नगर परिषदेच्या आवश्यकतेनुसार साहित्य् पुरवठा आदेश निर्गमित करण्यात येईल.

17.काम करतेवेळी कामात कसुर,हलगर्जीपणा किंवा कर्मचारी यांची मौखीक अथवा लिखीत तक्रार कार्यालयास प्राप्त झाल्यास मंजुर/स्वीकृत झालेली निविदा कोणतेही कारण न देता किंवा पुर्व सुचना न देता कायमस्वरूपी रदद करून फेर निविदा प्रक्रिया करण्यात येईल यांची कंत्राटदाराने नोंद घ्यावी.

**18.सदरील काम करते वेळी कोणतीही जिवित अथवा आर्थिक हानी झाल्यास त्यास नगर परिषद अधिकारी/कर्मचारी जबाबदार राहणार नाहीत त्याची संपुर्ण जबाबदार कंत्राटदाराची राहील.**

19. वरील अटी शर्तीचा भंग झाल्यास सुरक्षा ठेव पुर्णत: किंवा त्याचा कोणताही हिस्सा हस्तगत करण्याचा किंवा त्यातुन वसुल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहील.

मुख्याधिकारी
नगर परिषद वाशिम

Signature Not Verified
Digitally signed by GAJANAN GANGADHAR HIREMATH
Date: 2026.05.14 13:38:10 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner